**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६/२०१७-१८/२४८ दिनांक: २१.०७.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. १६/२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| १) कै. राम नारायण पाटील तर्फे श्रीमती शंकुतला सुरेश पाटील<br>५२ झोपडपट्टी जयसिंगपूर<br>ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| २) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय जयसिंगपूर | |
| ४) उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपाविभाग जयसिंगपूर | |

**कोरमः-** १.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी प्रदिप वि. खपली , कार्यकारी अभियंता तथा सचिव, ग्राहक तक्रार,निवारण मंच. कोल्हापूर खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवून आदेश करीत आहे.

आज दि.१८-०७-२०१७ रोजी मा.अध्यक्षसाो, ग्रा.त.नि.मं. कोल्हापूर हे प्रकृति अस्वाथामुळे उपस्थित राहू शकत नाहीत.

१) उपरोक्त तक्रारदार कै. राम नारायण पाटील तर्फे श्रीमती शंकुतला सुरेश पाटील रा. जयसिंगपूर ता. शिरोळ हे घरगुती विज ग्राहक आहेत. त्यांचा विज ग्राहक क्र. २५२५८०२२१२२९/४ आहे त्यांनी या मंचास चुकीचे विज बिलाबाबत व संबंधित दोषी कर्मचा-यावर दंडात्मक कार्यवाही करणे विषयी दिनांक २०.०५.२०१७ रोजी दाखल केली .

२) वि.प. यांनी लेखी निवेदन दाखल केले असून तक्रारदार यांना विजेचे बिल दुरुस्त करुन देण्यात आले आहे व संबंधित दोषी कर्मचा-यावर गोपनिय पत्राद्वारे खुलासा मागवण्यात आल्याचे कळविले आहे.

३) तक्रारदार यांनी दि. १७.०७.२०१७ रोजी लेखी पत्राद्वारे त्यांचे तक्रारीचे संपूर्ण निरसन झाल्यामुळे प्रस्तुत तक्रार क्र. १६(२०१७-१८) मागे घेत असल्याबाबत कळविले आहे.

## आदेश

तक्रारदार कै. राम नारायण पाटील तर्फे श्रीमती शंकुतला सुरेश पाटील राहणार ५२ झोपडपट्टी जयसिंगूपर ता. शिरोळ जि. कोल्हापूर यांच्या विनंती प्रमाणे प्रस्तुत प्रकरण वादाचा विषय परस्पर संपुष्टात आल्यामुळे निकाली काढण्यात येते.

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

21/07/2017

(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव